ePaper


**अनिल अंबानींना मोठा झटका! आणखी 1120 कोटींची मालमत्ता जप्त**




वर्ष - 9 । अंक -104 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com । सोमवार, दि. 8 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- कोहली झाला भक्तीत विलीन!
- अर्शदीपने विराट कोहलीला केले ट्रोल
- गोवा अग्निकांड: सरकार ॲक्शन मोडवर!
- इंडिगोचे संकट सहाव्या दिवशी कायम!

## घाटातील प्रवास सुरळीत होणार?; केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा

# पुणे-कोल्हापूर महामार्गाचा कायापालट!

## महामार्ग सुधारण्यासाठी 6000 कोटींचा मेगा प्लॅन मंजूर

- एका वर्षात प्रमुख कामे पूर्ण करण्याचा गडकरींचा निर्धार
- पुणे–कोल्हापूर Detailed Project Report मंजूर
- खंबाटकी घाटात दोन नवे बोगदे; एकाचे उद्घाटन लवकरच
- नवले पुल, कात्रज, शिंदेवाडी अपघातप्रवण पट्ट्यांवर विशेष लक्ष
- सातारा-कोल्हापूर मार्गावरील कामांना आधीच मंजुरी

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**पुणे-कोल्हापूर महामार्गाच्या व्यापक सुधारणांचे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरणार आहे. देशातील प्रमुख आर्थिक धमन्यांपैकी एक असलेल्या या महामार्गाला नवीन रूप देण्यासाठी तब्बल ६ हजार कोटींचा प्रकल्प अहवाल (DPR) तयार असून, त्यावर अंमलबजावणी लवकरच सुरू होणार असल्याची घोषणा केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत केली.**



पुणे आणि कोल्हापूरदरम्यानचा हा राष्ट्रीय महामार्ग (NH-48) मुंबई-बेंगळुरू प्रवासाला जोडणारा मुख्य रस्ता. दररोज हजारो प्रवासी आणि मालवाहतूक वाहने या मार्गाचा वापर करतात. मात्र, काँक्रिटीकरण अपुरे, सेवा मार्गांची कमतरता, सततच्या दुरुस्त्या, अपघातप्रवण वळणे, तसेच पुण्याच्या प्रवेशद्वारावरील वाहतूक कोंडीमुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागतो. हीच पार्श्वभूमी लक्षात घेऊन या महामार्गाचा कायापालट करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

### दोन नवे बोगदे – खंबाटकी घाटात मोठा दिलासा

पुणे-सातारा दरम्यानचा खंबाटकी घाट प्रवाशांसाठी सर्वाधिक डोकेदुखीचा मुद्दा. घाटातील तीव्र वळणे, अरुंद मार्ग आणि घनघोर वाहतूक यामुळे अपघातांचे प्रमाणही जास्त. या धोक्यांवर मात करण्यासाठी येथे दोन नवे बोगदे उभारले जात असून, त्यापैकी एक पूर्णत्वास आला आहे. गडकरी म्हणाले, “पूर्ण झालेल्या बोगद्याचे लवकरच उद्घाटन केले जाईल. दुसऱ्यावरही गतीने काम सुरू आहे.” बोगदे सुरू झाल्यानंतर प्रवास वेळ २० ते २५ मिनिटांनी कमी होणार असून, विशेषतः मालवाहतूक ट्रकांसाठी हा मार्ग अधिक सुरक्षित आणि वाहतुकीला सुटसुटीत होणार आहे.

### पश्चिम बायपास आणि सेवा रस्त्यांना गती

पुण्यात प्रवेश करताना कात्रज टनेल परिसर, शिंदेवाडी, नवले पुल हा परिसर सतत कोंडीत अडकलेला! याच ठिकाणी अपघातांची संख्या जास्त असल्याचे आकडेवारी दाखवते. महामार्गावरून शहरात घुसणाऱ्या वाहनांमुळे शहरातील वाहतुकीवर मोठा दबाव तयार होतो. या समस्येवर उपाय म्हणून पश्चिम बायपासवरील सेवा मार्गांचे बांधकाम मंत्रालय स्वतः निधी देऊन पूर्ण करणार आहे. यामुळे स्थानिक वाहतूक आणि महामार्ग वाहतूक यांच्यातील संघर्ष कमी होणार असून, अपघातांचे प्रमाण घटेल, असा अपेक्षाही व्यक्त होत आहे.

## पुणे-कोल्हापूर महामार्गाला नवं रूप मिळणार

६ हजार कोटींच्या या प्रकल्पामुळे पुणे-कोल्हापूर महामार्गाला नवं रूप आणि प्रवाशांना सुरक्षित, वेगवान प्रवास मिळण्याची आशा आता तेजीत आहे. आता पाहू... महामार्गाचा हा कायापालट कागदावरून प्रत्यक्षात किती वेगाने उतरतो!

### सातारा–कोल्हापूर मार्गाच्या कामांना मंजुरी

सातारा आणि कोल्हापूरदरम्यानच्या रस्त्याच्या सुधारणा कामांना आधीच मंजुरी मिळाली असल्याचे गडकरींनी स्पष्ट केले. या भागातील काही ठिकाणी विद्यमान विस्तार अपुरा असल्याने ओव्हरटेकिंग दरम्यान अपघातांचा धोका वाढतो. नवीन प्लॅननुसार अधिक रुंदलेला मार्ग, बस थांबा सुधारणा, कट पॉइंट्सचे नियोजन यावर अधिक लक्ष दिले जाणार आहे.

### एका वर्षात मुख्य बदल दिसणार

“एका वर्षात प्रमुख सुधारणा पूर्ण होतील. पृष्ठभाग सुधारणा, दुरुस्ती आणि काँक्रिटीकरण वेगाने पूर्ण केले जाईल,” असे गडकरींनी स्पष्ट केले. या कामांचा वेग वाढल्याने बेंगळुरूकडे जाणाऱ्या मालवाहतुकीचा प्रवासही अधिक सुलभ होणार आहे.

### सुळे यांची कडक भूमिका : “विलंब किती काळ?”

बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना गडकरींनी ही माहिती दिली. त्यांनी सदर कामांमध्ये होणाऱ्या वारंवार विलंबांवर संताप व्यक्त केला. त्यांनी थेट प्रश्न केला, “काही कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकले आहे... मग आता काम पूर्ण कधी होणार?” नवले पुल परिसरातील अपघातमुक्तीच्या कामांत गती आणण्याची मागणीही त्यांनी केली.

प्रवाशांची दमछाक सुरुच स्थानिक प्रवाशांचा आक्रोशही दिवसेंदिवस वाढतोय... “रोज दोन-तीन तास कोंडीत उभं राहावं लागतं, कात्रज-शिंदेवाडीत वेगळाच त्रास!” अशी प्रतिक्रिया प्रवासी देताना दिसतात. रात्रीच्या वेळेस ट्रक वाहतूक वाढल्याने सुरक्षा धोक्यांचे प्रमाण अधिक वाढते.

**धोरणात्मक महत्त्व** – उद्योग आणि पर्यटनाला बूस्ट, पुणे-सातारा-कोल्हापूर हा पट्टा

**उद्योग उत्पादन साखर व दुग्ध व्यवसाय**

धार्मिक पर्यटन (कोल्हापूर – अंबाबाई) या बाबींमुळे प्रदेशाच्या आर्थिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा. तसेच कर्नाटकासह दक्षिण भारताशी ‘गोल्डन कॉरिडॉर’ म्हणूनही हा मार्ग ओळखला जातो.

## जुन्नरच्या विकासाला धक्का
## पुणे-नाशिक मार्ग शिर्डीमार्गे वळवण्याचा निर्णय

# आंबेगाव-जुन्नर रेल्वे मार्ग बदलला

।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पुणे-नाशिक रेल्वे मार्ग शिर्डीमार्गे वळवण्याचा निर्णय जाहीर होताच आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. रेल्वे मार्ग बदलल्याने विकासाला मोठा धक्का बसला असून पर्यटन आणि उद्योगक्षेत्रात नाराजीची भावना तयार झाली आहे. गेल्या तीन दशकांपासून आंबेगाव-जुन्नर या भागातून रेल्वेमार्ग जाणार अशी आशा नागरिक, व्यावसायिक, शेतकरी आणि पर्यटन क्षेत्राला होती.**

## इतर कंपन्यांची उड्डाणे सुरळीत



तीन वेळा याच मार्गाचे सर्वेक्षण झाले, खेड-मंचर परिसरात भूसंपादनही करण्यात आले. काही शेतकऱ्यांना तर भूसंपादनाचा मोबदला देखील मिळाला. त्यामुळे रेल्वे मार्ग निश्चित झाला असल्याचा विश्वास निर्माण झाला होता. मात्र आता रेल्वे मार्ग शिर्डीकडे वळवल्याने या दोन तालुक्यांच्या सर्वांगीण विकासाला मोठी खिळ बसल्याची भावना व्यक्त केली जात आहे.आंबेगाव आणि जुन्नर परिसर पर्यटनदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा असून मोठ्या प्रमाणात आदिवासी क्षेत्रही आहे. श्री क्षेत्र भीमाशंकरासारखे जागतिक कीर्तीचे आध्यात्मिक स्थळ, अष्टविनायकांतील ओझर व लेण्याद्री, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान शिवनेरी ही ऐतिहासिक स्थळे रेल्वे मार्ग बदल्यामुळे रेल्वे रुळापासून दूर गेली आहेत. त्यामुळे पर्यटनाला मिळणारा वाव कमी झाला असून या निर्णयामुळे या भागातील आर्थिक प्रगती कोलमडणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. “आमचा द्राक्ष, टोमॅटो, भाजीपाला याचा 66 मोटा पुरवटा पुणे नाशिक दरम्यान होला रेल्वेमुळे माल पोहोचवणे स्वस्त आणि जलद झाले असते. आता पुन्हा महागडे ट्रान्सपोर्टवर अवलंबून राहावे लागेल.रेल्वे आंबेगाव-जुन्नर मार्गे गेली असती तर व्यवसायाला नवी दिशा मिळाली असती, मालवाहतूक खर्च कमी झाला असता आणि बाहेरून ग्रहक येण्यासाठी मोठी सोय झाली असती. हा निर्णय ऐकून तीव्र नाराजी वाटते.८८ शिवनेरी, भीमाशंकर, ओझर येथे पर्यटन प्रचंड आहे. रेल्वेमुळे पर्यटकांचा ओघ वाढून हॉटेल उद्योग दुप्पट वाढला असता. आता मार्ग बदलल्याने विकास थांबणार अशी भीती आहे, असे मत मंचर येथील हॉटेल व्यावसायिक संदेश बागल व घोडेगाव येथील हॉटेल व्यावसायिक धनंजय फलके यांनी व्यक्त केले.रेल्वे मार्ग या भागातून गेल्यास उद्योगपती, पर्यटन क्षेत्र, शिक्षण संस्था, व्यापारी वर्ग आणि स्थानिक लोकांना मोठा फायदा झाला असता. परंतु मार्ग बदलल्याने विकासाची अडथळ्यात अडकणार असल्याची – भीती निर्माण झाली आहे. आदिवासी व दुर्गम भागातील तरुणांना रोजगार, जोडधंदे, गाडी बाजारपेठ आणि सोयीसुविधा उपलब्ध होण्याची अपेक्षा – होती. रेल्वेमुळे या दोन तालुक्यांचा नकाशाच पालटेल, असा विश्वास नागरिकांना होता. आता हा प्रकल्प दूर गेल्याने “विकासाचे दार बंद झाले” अशी नाराजी निर्माण झाली आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींची निष्क्रयता आणि योग्य पातळीवर पाठपुरावा न झाल्याचीही जोरदार चर्चा आहे. अनेक वर्षांपासून आशा लावून बसलेल्या नागरिकांमध्ये अविश्वासाची भावना वाढत आहे. रेल्वे प्रकल्पावर पुनर्विचार व्हावा, असा जोरदार आवाज उठू लागला आहे. ८८ रेल्वे आल्यास इथल्या पर्यटन व्यवसायाला प्रचंड बालना मिळाली असती, स्थानिक चालक, मार्गदर्शक, दुकानदार सर्वांनाच फायदा झाला असता, आता मार्ग सरळ शिर्डीकडे गेल्याने आमचे नुकसान झाले आहे.रेल्वे मार्ग बदलल्याने विकासाला मोठा धक्का बसला असून पर्यटन आणि उद्योगक्षेत्रात नाराजीची भावना तयार झाली आहे. गेल्या तीन दशकांपासून आंबेगाव-जुन्नर या भागातून रेल्वेमार्ग जाणार अशी आशा नागरिक, व्यावसायिक, शेतकरी आणि पर्यटन क्षेत्राला होती.  तीन वेळा याच मार्गाचे सर्वेक्षण झाले, खेड-मंचर परिसरात भूसंपादनही करण्यात आले.

## सर्वांगीण विकासाला मोठी खिळ

रेल्वे मार्ग निश्चित झाला असल्याचा विश्वास निर्माण झाला होता. मात्र आता रेल्वे मार्ग शिर्डीकडे वळवल्याने या दोन तालुक्यांच्या सर्वांगीण विकासाला मोठी खिळ बसल्याची भावना व्यक्त केली जात आहे.आंबेगाव आणि जुन्नर परिसर पर्यटनदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा असून मोठ्या प्रमाणात आदिवासी क्षेत्रही आहे.अष्टविनायकांतील ओझर व लेण्याद्री, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान शिवनेरी ही ऐतिहासिक स्थळे रेल्वे मार्ग बदल्यामुळे रेल्वे रुळापासून दूर गेली आहेत.

# ८ कोटींची लाच, ३० लाख घेताना अटक

## नवीन 32 सदस्यांना शेअर सर्टिफिकेट देण्यासाठी आठ कोटीची लाच

।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**एका सोसायटीच्या नवीन ३२ सदस्यांना समभाग प्रमाणपत्र (शेअर सर्टिफिकेट) देण्यासाठी आठ कोटी रुपयांची लाच मागून, पहिल्या टप्प्यात ३० लाख रुपयांची लाच स्वीकारताना सहकार खात्यातील प्रशासकाला एसीबीच्या पथकाने रंगेहात पकडले.**



तत्कालीन प्रशासक भास्कर राजाराम पोळ (वय ५६, रा. सुश्रुत रेसीडन्सी, नऱ्हे) याला अटक करण्यात आली असून, त्याच्यासह अवसायक विनोद माणिकराव देशमुख (वय ५०, रा. सिंहगड दर्शन सोसायटी, धायरी फाटा), यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धनकवडीतील एकता सहकारी सोसायटीच्या जुन्या सभासदांकडून तक्रारदार आणि इतर ३२ नवीन सदस्यांनी समभाग खरेदी केले होते.त्यासंदर्भात सहकार विभागाकडे गेलेल्या वादामध्ये या नवीन सदस्यांनी प्रशासक भास्कर पोळ यांच्याकडे समभाग प्रमाणपत्र देण्यासाठी अर्ज केला होता.

मात्र तक्रारदार अनुपस्थित असल्याने त्यांचा अर्ज प्रलंबित ठेवण्यात आला. जेंव्हा तक्रारदार पोळ यांच्याकडे गेले त्यावेळी त्यांनी तक्रारदार आणि इतर नवीन ३२ सदस्यांना समभाग प्रमाणपत्र देण्यासाठी ३ कोटी रुपयांची मागणी केली. त्याच बरोबर भविष्यात सोसायटीच्या लिलाव प्रक्रियेत तक्रारदार सांगतील, त्या व्यक्तीस जागा मिळवून देऊ, असे सांगून पोळ याने आणखी पाच कोटी रुपये जादाची लाच मागितली. मागितल्याचे निष्पन्न झाले. शनिवारी सायंकाळी पोळ हे तक्रारदाराच्या शनिवार पेठेतील कार्यालयाजवळ लाच घेण्यासाठी आले.

## लाच मागितल्याचे निष्पन्न

पोळ यांना पकडले, याप्रकरणी पोळ यांच्यासह अवसायाकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त अधीक्षक अजिय पाटील, अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त नीता मिसाळ आणि पथकाने ही कारवाई केली. पोलीस निरीक्षक प्रवीण निंबाळकर तपास करत आहेत.अहिल्यानगरमध्ये भूमी अभिलेख कार्यालयातील भूकरमापक अजयभानसिंग गुलाबसिंग परदेशी (वय 48) यांना नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने तब्बल 1.5 लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले.

पिंपरी-चिंचवड महानगर पालिका निवडणूक : मिशन- PCMC : भोसरी विधानसभेत

# भाजपा ‘ऑन फायर मोड’वर!

## कार्यकर्तेच ठरवणार, महापालिका निवडणुकीचे सक्षम उमेदवार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क आणि प्लॅनेटेरियमच्या पुढाकाराने नागरी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्रात कोडिंग, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार असून ॲडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात आली आहे.**




“प्रत्येक घरापर्यंत भाजपा आणि कमळ चिन्ह पोहोचवण्यासाठी संघटनात्मक कार्याला आम्ही गती दिली आहे. पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना एकजुटीने, “कमळ हाच उमेदवार” या भावनेने काम करीत आहेत. भाजपाच्या प्रभागनिहाय मजबूत रचना, समन्वयक प्रणाली आणि सूक्ष्म मोर्चेबांधणीच्या बळावर 2014, 2019 आणि 2024 च्या विधानसभा निवडणुकांमध्ये आम्ही सलग विजय मिळवला. 2017 च्या महानगरपालिका निवडणुकीतही ही यंत्रणा निर्णायक ठरली आहे. त्यामुळे या महापालिका निवडणुकीतसुद्धा प्रभाग यंत्रणा गतीमान केली आहे. हिवाळी अधिवेशन ल्यानंतर लगेच प्रभाग कमिटी सदस्यांसोबत प्रत्यक्ष संवाद साधणार आहे.

– **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आगामी निवडणुकीच्या निमित्ताने भोसरी विधानसभा मतदार संघात भाजपा ‘ऑन फायर मोड’ वर आहे. पक्षाकडून इच्छुक अर्ज वितरण सुरू झाल्यानंतर आज एकाच वेळी मतदार संघातील 12 प्रभागांमध्ये पक्षाचे इच्छुक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि प्रभाग कमिटीची बैठक घेण्यात आली. विशेष म्हणजे, कमिटी सदस्यांकडून उमेदवार कोण असावा? याबाबत गोपनीय अभिप्राय घेतले आहेत. त्यामुळे भाजपाचे सक्रीय कार्यकर्तेच महापालिका निवडणुकीचे सक्षम उमेदवार ठरवतील, असा संदेश यानिमित्ताने दिला आहे.

भाजपाचे नेते व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या कोअर कमिटीच्या सूचनांची अंमलबजावणी करण्यावर भर दिला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक 2025-26 च्या पार्श्वभूमीवर भोसरी विधानसभा मतदारसंघात प्रभागनिहाय भाजपा पदाधिकारी, माजी नगरसेवक, इच्छुक उमेदवार व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

दरम्यान, आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली भोसरी विधानसभा मतदार संघात आगामी निवडणुकीसाठी पक्षाची संघटनात्मक यंत्रणा अधिक मजबूत करण्यावर विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. बैठकी दरम्यान प्रभागातील संभाव्य उमेदवारांविषयी गोपनीय अभिप्राय घेण्यात आला. संपूर्ण पॅनेल विजयी होण्यासाठी आवश्यक सूचना, अपेक्षा व सामाजिक समीकरणांचा अभ्यासही करण्यात आला. हिवाळी अधिवेशनानंतर प्रभागस्तरीय कोअर कमिटीसोबत प्रत्यक्ष संवाद साधत पुढील रणनीती अंतिम केली जाणार आहे.

भारतीय जनता पार्टीच्या तिकीटावर उमेदवारी लढवण्यासाठी इच्छुकांची संख्या मोठी आहे. एका जागेसाठी किमान चार-पाच इच्छुक आहेत. तिकिट एकाच उमेदवाराला मिळणार आहे. त्यामुळे संभाव्य नाराजी टाळणे आणि एकजुटीने ‘कमळ’ चिन्हाचा प्रचार करावा. उमेदवारी किंवा प्रभागातील कारणांवरुन मतभेद असतील, तर त्यावर सामंजस्याने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

2014 च्या विधानसभा निवडणुकीत ज्या कार्यकर्त्यांनी आमदार लांडगे यांचे काम प्रभावीपणे केले. त्यांना 2017 च्या महापालिका निवडणुकीत संधी देण्यात आली. त्यानंतर महापालिका सत्ताकाळात अनेक प्रमाणिक समर्थकांनी मानाची पदेही देण्यात आली. त्यानंतर 2019 आणि 2014 मध्ये भारतीय जनता पार्टीचे काम निष्ठेने करणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्यांना महापालिका निवडणुकीत संधी देण्याची भूमिका आहे. त्या अनुशंगाने कार्यकर्त्यांमधून उमेदवार निश्चित व्हावा, अशी सर्वसमावेशक भूमिका आमदार लांडगे यांनी घेतली आहे, अशी माहिती सरचिटणीस विकास डोळस यांनी दिली.

# कंपनीची भिंत अंगावर कोसळून मजुराचा मृत्यू

## कंपनीतील बांधकामाच्या ठिकाणी काम सुरू असताना भोसरी एमआयडीसीतील घटना

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कंपनीतील बांधकामाच्या ठिकाणी ब्रेकर मशीनच्या सहाय्याने लेवलचे काम सुरू असताना हादऱ्याने शेजारील कंपनीची सुमारे २५ फूट उंच भिंत अंगावर कोसळून झालेल्या दुर्घटनेत मजुराचा मृत्यू झाला. ही घटना भोसरी एमआयडीसीतील जे ब्लॉकमध्ये मॉडल मेटल वर्क या कंपनीत सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास घडली.**






मारुती राघोजी भालेराव (वय ३२, रा. रानुबाई मळा, चाकण) असे मृत्युमुखी पडलेल्या मजुराचे नाव आहे. भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक के. एस. पठारे यांनी याबाबत माहिती दिली. भोसरी एमआयडीसीतील जे ब्लॉकमध्ये मॉडर्न मेटल वर्क ही कंपनी आहे. कंपनीत सध्या काही बांधकाम सुरू आहे. त्यासाठी खोदकाम करण्यात आले होते.

शनिवारी सायंकाळी मजूर भालेराव आणि एक जेसीबी चालक यांच्याकडून बांधकामाच्या ठिकाणी ब्रेकर मशीनच्या सहाय्याने लेवलचे काम सुरू होते. काम सुरू असताना हादऱ्यामुळे अचानक शेजारी असणाऱ्या दर्शन स्टील या कंपनीची सुमारे २५ फूट उंच सीमा भिंत आणि शेड मजूर भालेराव यांच्या अंगावर कोसळले. यात भिंतीच्या राडारोडयाखाली सापडल्याने भालेराव हे गंभीर जखमी झाले. हा प्रकार लक्षात येताच जेसीबी चालकाने आरडाओरडा केला. या घटनेबाबत तातडीने महापालिका अग्निशामक दलाला कळविण्यात आले. याची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे रेस्क्यू पथक तातडीने घटनास्थळी रवाना झाले. गंभीर जखमी अवस्थेतील भालेराव यांना त्वरित महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.




# सरकारची वर्षपूर्ती ; माध्यमांची चमचेगिरी



**महायुती सरकारनं एक वर्ष पूर्ण केलं. त्यानिमित्त मराठीतील प्रसारमाध्यमांमध्ये देवेंद्र फडणवीस यांची चमचेगिरी करण्याची जी चढाओढ लागली त्याला तोड नाही. नरेंद्र मोदींचे लांगूलचालन करणारे दिल्लीतले पत्रकार लाजून चूर व्हावेत, असा महाराष्ट्रातला एकूण माहोल आहे.**

म्हणजे एकीकडं रोजच्या रोज फडणवीस सरकारच्या अब्रूची लक्तरं वेशीवर टांगली जात असताना फडणवीस यांनाच कशी लोकांची पसंती आहे आणि तेच कसे लोकप्रिय आहेत, असं यच्चयावत सगळे सर्व्हे सांगत होते. फडणवीसांनाही सगळं ऐकून लाजल्यासारखं झालं असल्यास नवल नाही.सरकारचं यशापयश कशाच्या आधारे मोजायचं असतं? त्याचं नेमकं काय परिमाण असू शकतं? असं कुठलंही परिमाण नसल्यामुळं मग सर्व्हेचा आधार घेतला जातो. ज्यांच्या बाजूनं सर्व्हे करायचा आहे त्यांच्याकडून पैसे घेऊन अनेकदा असे सर्व्हे केले जातात. जाहिरातीच्या दरानं पैसे घेऊन तो प्रसिद्ध केला जातो. म्हणजे जशी मतचोरी असते, तशीच या सर्व्हेमधल्या मतांमध्ये चोरी केली जाते. खरंतर सर्व्हे शास्त्रीय पद्धतीनं केला तर सँपल कमी घेतले तरी वस्तुस्थितीचा काहीएक अंदाज येऊ शकतो. जास्ती सँपल तेवढा अधिक विश्वासार्ह सर्व्हे असं होत नाही. पण इथं आधी सर्व्हेचा निकाल ठरवला जातो. आणि त्यानुसार मग पुढची रचना केली जाते. त्यासाठी फक्त देखावा शास्त्रीय उभा केला जातो.

देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री म्हणून किंवा मंत्री म्हणून किती गुण देता येतील? एकपासून दहापर्यंत आपापल्या आकलनानुसार गुण देता येऊ शकतात. पण त्यांच्याकडच्या ऊर्जा खात्याचं काम चांगलं झालंय. तिथं एखादा दहापैकी नऊ गुण देऊ शकतो. पण त्याचवेळी फडणवीस यांच्याकडच्या गृहखात्याला दहापैकी एक किंवा शून्य गुण मिळू शकेल. किंवा अगदी मायनसमध्येही जाऊ शकते गृहखाते. अशावेळी त्यांना मंत्री म्हणून सरासरी पाच गुण मिळाले असं म्हटलं जाईल. ते कितपत वस्तुस्थितीनिदर्शक आहे. ऊर्जा खात्याच्या चांगल्या कामामुळं गृहखात्याच्या सुमार कामगिरीची भरपाई होऊ शकत नाही. ऊर्जा खात्याच्या उजेडामुळं गृहखात्याच्या बुडाखालचा अंधार दूर होऊ शकत नाही. त्यामुळंच काहीएक अंदाज देणा-या सर्व्हेचे निष्कर्ष अशावेळी निष्प्रभ ठरतात. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालच्या महायुती सरकारनं पायाभूत सुविधा क्षेत्रात केलेलं काम नजरेत भरणारं आहे. मुंबई मेट्रो. कोस्टल रोड, अटल सेतू किंवा समृद्धी महामार्ग. ही कामं फोटोशॉपशिवायही उत्तमपणे दाखवता येऊ शकतात. पण त्याचवेळी या कामांच्या दर्जाबाबतही बोलायला हवं. समृद्धी महामार्ग पावसाळ्यात जलमार्ग का झाला, याचं उत्तर मिळालेलं नाही. समृद्धी महामार्ग उभारताना जी स्वप्नं दाखवली होती, त्यांचं काय झालं? समृद्धी महामार्गामुळं मुंबई-नागपूर प्रवास वेगवान झालाय हे खरं पण त्यावरच्या वाढत्या अपघातांवर नियंत्रण आणण्यासाठी सरकारकडं कोणती यंत्रणा आहे? त्यावर होणारे चोरी,लुटालुटीचे प्रकार रोखण्यासाठी काय उपाययोजना आहे?

जे समृद्धी महामार्गाचं तेच अटलसेतूचं. अटल सेतूमुळं दक्षिण मुंबईतून लवकर बाहेर पडता येतं. पण १७ हजार कोटींच्या या रस्त्यावर सतरा महिन्यांत खड्डे कसे पडले? वीस फुटांच्या खड्ड्याचा विक्रम अटल सेतूवरच घ़डला आहे. निकृष्ट काम आणि त्याचं कारण भ्रष्टाचार. पायाभूत सुविधांचे ढोल वाजवून श्रेय घेणार. मग या भ्रष्टाचाराची जबाबदारी कुणाची?

शक्तिपीठ महामार्ग कुणाला हवाय? सरकारला की कंत्राटदारांना? लोकप्रिय योजनांमुळं सरकार आर्थिक अडचणीत आहे. पक्ष चालवण्यासाठीचा पैसा उभारायला नको असलेले प्रकल्प लोकांच्या बोकांडी मारले जात आहेत. शेतक-यांचा मोठा विरोध असताना कुणाच्या हितसंबंधांसाठी शक्तिपीठ महामार्ग रेटला जातोय? मिळालेल्या प्रचंड बहुमतानंतर लोकमताचा आदर राखण्याचं सौजन्य सरकारनं दाखवायला पाहिजे होतं, परंतु लोकभावना दडपून पुढं जाण्यासाठी पाशवी बहुमताचा उपयोग केला जातोय. नाशिकच्या तपोवनमधील वृक्षतोडीला प्रचंड विरोध होत असतानाही त्याची दखल घेण्याचं सौजन्य मुख्यमंत्री दाखवत नाहीत. शेतक-यांच्या कर्जमाफीचं आश्वासन निवडणुकीत दिलं होतं. परंतु सत्तेवर आल्यानंतर सरकारने हात झटकले. आमच्या पक्षाच्या जाहीरनाम्यात कर्जमाफीचा उल्लेख नव्हता, असं अर्थमंत्री अजित पवार जाहीरपणे सांगत होते. बच्चू कडू यांच्या उपोषणानंतर त्यासंदर्भात घोषणा करण्यात आली.

## प्रासंगिक »

# विचार तर कराल

***सहा डिसेंबर हा डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन असतो. त्यानिमित्ताने त्यांचे आपण स्मरण करतो.***

भारताच्या संविधान निर्मितीचा इतिहास हा आधुनिक भारताच्या सामाजिक रूपांतरणाचा आणि मानवमुक्तीच्या लढाईचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. १९४६ साली स्थापन झालेली संविधान सभा ही भारताचे शासकीय, राजकीय, सामाजिक आणि नैतिक भविष्य ठरवणारी ऐतिहासिक संस्था होती. या सभेची सुरुवातीची एकूण सदस्यसंख्या ३८९ इतकी होती. त्यापैकी २९६ सदस्य ब्रिटिश भारतातील प्रांतांतून आणि ९३ सदस्य त्या काळातील संस्थानांमधून निवडून आले होते. परंतु १९४७ च्या फाळणीमुळे पाकिस्तान वेगळा झाल्यानंतर भारताच्या संविधान सभेतील सदस्यसंख्या कमी होऊन २९९ इतकी झाली. या सभेतील सदस्य बहुतांश सर्व राजकीय पक्षांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करत होते, मात्र त्यात काँग्रेस पक्षाची बहुसंख्या होती. काँग्रेस पक्षाकडे मोठ्या प्रमाणात जागा असल्याने संविधान निर्मितीच्या प्रक्रियेत त्या पक्षाचा प्रभाव मोठा होता.

कधी एखादी घटना वास्तवात घडते तेव्हा आपण म्हणतो ‘हे मी कुठेतरी आधी वाचले आहे.’ कारण शब्दांच्या माध्यमातून आपण आधीच ते अनुभवलेले असते. पुस्तक म्हणजे आपल्या स्मृतीचे गुप्त आरसे.ज्यू-ख्रिश्चन परंपरेनुसार “विश्व हेच एक पुस्तक आहे.” अक्षरांनी आणि अंकांनी लिहिलेले.

# देवळे नव्हे ज्ञान मंदिरे उभारा !

त्या विश्वाचे आकलन आपली वाचन क्षमता जितकी खोल तितके अधिक. म्हणूनच प्रत्येक पुस्तकात आपल्याला आपल्या आयुष्याचे तुकडे भेटतात. प्रत्येक वाचकाचे आत्मचरित्र वेगळे असते कारण तो प्रत्येक वेळी नव्याने अर्थ शोधतो. कधी आपण एकच इतिहास अनेक पुस्तकांत वाचतो, पण प्रत्येक वेळी आपले मत बदलते. कारण पुस्तक वाचणे म्हणजे लेखकावर विश्वास ठेवणे; आणि प्रत्येक लेखक आपल्याला वेगळ्या दिशेने नेतो.तुर्की कादंबरीकार ओरहान पामुक लिहितो “आयुष्याचा प्रवास एकदाच घडतो; पण पुस्तक हातात असेल तर तो पुन्हा पुन्हा करता येतो.” वाचन म्हणजेच पुनर्जन्म शब्दांमधून आपण पुन्हा जगतो, पुन्हा जाणतो.इतालो कॅल्विनो म्हणतो,“वाचन म्हणजे अगदी या क्षणी अस्तित्वात असलेल्या गोष्टीच्या अधिक जवळ जाणे.” अशा क्षणी वाचक आणि शब्द यांच्यातील भिंत गळून पडते; दोघे एकरूप होतात.जोहान गुटेनबर्गने १४५५ मध्ये छपाई यंत्र शोधून वाचनाचे



लोकशाहीकरण केले. हस्तलिखितांची दडपणखोर प्रतिष्ठा कमी झाली, आणि पुस्तक सर्वसामान्यांच्या हातात आले. सुरुवातीला लगेच हस्तलिखितांचे आकर्षण कमी झाले नाही उलट तांत्रिक प्रगतीमुळे त्यांचे वेगळेपण अधिक ठसले. कल्पनाशक्ती आता फक्त राजदरबारात नव्हे, तर साध्या घरांतही पोचल्या.स्वतःच्या अंतर्मनात प्रत्येक पानाला पुनर्जन्म देतो; आणि म्हणूनच वाचनसंस्कृती ही कोणत्याही सभ्यतेचे हृदय आहे, जिथे शब्दांची नाळ जुळते.

१९ व्या शतकात औद्योगिक युगातही वाचन हा कामगारवर्गासाठी आशेचा दिवा ठरला. क्यूबाच्या सिगारेट कारखान्यात ‘सार्वजनिक वाचन’ चळवळ सुरू झाली एखादा कामगार सर्वांसमोर पुस्तक वाचून दाखवत असे. त्यातून विचारांची जागरूकता, भाषेचा साक्षात्कार आणि सामाजिक बंध वाढले. वाचनाने केवळ मन नव्हे तर समाजही बदलला. अमेरिकन कवी वॉल्ट व्हिटमन म्हणतो “लेखन, लेखक, वाचक आणि विश्व हे परस्परात प्रतिबिंबित होतात.” वाचक पुस्तकाला आत्मसात करतो आणि पुस्तक वाचकाचे अस्तित्व व्यापते. कधी कधी वाचन हे लेखकापेक्षा अधिक सर्जनशील ठरते. कारण वाचक त्याच्या कल्पनेने मजकुराला नवा अर्थ देतो. रिल्के म्हणतो “भाषांतर म्हणजे मूळ भाषेच्या वाटेवरील अंतिम टप्पा.” अर्थात, प्रत्येक वाचक हाच एक भाषांतरकार असतो; तो वाचताना शब्दांचा अर्थ आपल्या आयुष्याशी जोडून नव्याने जन्म देतो. काफ्का म्हणतो “आपल्याला दंश करणारीच पुस्तके वाचायला हवीत.” कारण वाचन म्हणजे सुखद करमणूक नाही, ती एक ‘अंतःक्रांती’ आहे. पुस्तकाने आपल्याला हलवले नाही, हादरवले नाही, तर ते केवळ वस्तू आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## नाशिकजवळ मोठी दुर्घटना

## सप्तशृंगी गडावरून परतणाऱ्या ६ भाविकांचा मृत्यू

# इनोव्हा 800 फूट दरीत कोसळली!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**रविवारी सप्तशृंगी देवी गडाचे दर्शन घेऊन परतणाऱ्या भाविकांची इनोव्हा कार ८०० फूट खोल दरीत कोसळल्याने कारमधील एकाच कुटुंबातील ६ भाविकांचा जागीच मृत्यू झाला. वणी गावाजवळ भावरी धबधब्याच्या (BHAVRI WATERFALL) नजीक घाटाच्या धोकादायक वळणावर ही दुर्घटना घडली.**

### दर्शन करून परतताना दुर्दैवी घटना



दर रविवारी सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. त्याचप्रमाणे पाच भाविकांची इनोव्हा कार देवीचं दर्शन घेऊन खाली परतत होती. याचदरम्यान घाटातील एका ठिकाणी चालकाचे नियंत्रण सुटले आणि कारने संरक्षण कठडा तोडून थेट खोल दरीत उडी घेतली. मिळालेल्या माहितीनुसार, इनोव्हा कार घाट मार्गावर ओव्हरटेक करत असताना अचानक नियंत्रण सुटल्यामुळे ती दरीत कोसळली. कीर्ती पटेल (५०), रसीला पटेल (५०), विठ्ठल पटेल (६५), लता पटेल (६०), पचन पटेल (६०) आणि मणिबेन पटेल (६०). असे अपघातात मृत्यु झालेल्या मृत झालेल्यांची नावे आहे. मृत झालेले सर्व भाविक हे पिंपळगाव बसवंत येथील रहिवासी असून ते एकमेकांचे नातेवाईक होते. अपघाताची माहिती मिळताच पोलीस, सप्तशृंगी गड आपत्ती व्यवस्थापन दल आणि ग्रामपंचायतीचे सदस्य तातडीने घटनास्थळी पोहोचले.कार ज्या ठिकाणी कोसळली, ती जागा अतिशय धोकादायक आणि सुमारे ८०० फूट खोल सरळ दरी असल्याने बचाव पथकाला खाली उतरण्यास मोठ्या अडचणी येत आहेत. अपघातात मृत पावलेल्या भाविकांचे मृतदेह रात्री उशिरापर्यंत बाहेर काढता आले नव्हते. नाशिकहून अतिरिक्त बचाव पथक बोलावण्यात आले असून बचावकार्य सुरू आहे. स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागावर गंभीर निष्काळजीपणाचा आरोप केला आहे. घाटाच्या या वळणावर रस्ता अत्यंत खराब आहे आणि अनेक वेळा तक्रार करूनही तो दुरुस्त केला गेला नाही. रस्त्याची ही खराब स्थितीच या भीषण दुर्घटनेला मोठे कारण ठरली, असा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत.रविवारी सप्तशृंगी देवी गडाचे दर्शन घेऊन परतणाऱ्या भाविकांची इनोव्हा कार ८०० फूट खोल दरीत कोसळल्याने कारमधील एकाच कुटुंबातील ६ भाविकांचा जागीच मृत्यू झाला. वणी गावाजवळ भावरी धबधब्याच्या (BHAVRI WATERFALL) नजीक घाटाच्या धोकादायक वळणावर ही दुर्घटना घडली. दर रविवारी सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी हजारो

### सरळ दरीत गाडी कोसळली

रविवारी सप्तशृंगी देवी गडाचे दर्शन घेऊन परतणाऱ्या भाविकांची इनोव्हा कार ८०० फूट खोल दरीत कोसळल्याने कारमधील एकाच कुटुंबातील ६ भाविकांचा जागीच मृत्यू झाला. वणी गावाजवळ भावरी धबधब्याच्या (BHAVRI WATERFALL) नजीक घाटाच्या धोकादायक वळणावर ही दुर्घटना घडली. दर रविवारी सप्तशृंगी देवीच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात.

भाविक गर्दी करतात. त्याचप्रमाणे पाच भाविकांची इनोव्हा कार देवीचं दर्शन घेऊन खाली परतत होती. याचदरम्यान घाटातील एका ठिकाणी चालकाचे नियंत्रण सुटले आणि कारने संरक्षण कठडा तोडून थेट खोल दरीत उडी घेतली. मिळालेल्या माहितीनुसार, इनोव्हा कार घाट मार्गावर ओव्हरटेक करत असताना अचानक नियंत्रण सुटल्यामुळे ती दरीत कोसळली. कीर्ती पटेल (५०), रसीला पटेल (५०), विठ्ठल पटेल (६५), लता पटेल (६०), पचन पटेल (६०) आणि मणिबेन पटेल (६०). असे अपघातात मृत्यु झालेल्या मृत झालेल्यांची नावे आहे. मृत झालेले सर्व भाविक हे पिंपळगाव बसवंत येथील रहिवासी असून ते एकमेकांचे नातेवाईक होते. अपघाताची माहिती मिळताच पोलीस, सप्तशृंगी गड आपत्ती व्यवस्थापन दल आणि ग्रामपंचायतीचे सदस्य तातडीने घटनास्थळी पोहोचले.कार ज्या ठिकाणी कोसळली, ती जागा अतिशय धोकादायक आणि सुमारे ८०० फूट खोल सरळ दरी असल्याने बचाव पथकाला खाली उतरण्यास मोठ्या अडचणी येत आहेत. अपघातात मृत पावलेल्या भाविकांचे मृतदेह असून बचावकार्य सुरू आहे. स्थानिक नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागावर गंभीर निष्काळजीपणाचा आरोप केला आहे. घाटाच्या या वळणावर रस्ता अत्यंत खराब आहे आणि अनेक वेळा तक्रार करूनही तो दुरुस्त केला गेला नाही.

# कोल्हापूरमध्ये शिवसेनेची ताकद वाढणार

## माजी महापौर सई खराडे यांचा शिंदेंच्या उपस्थितीत प्रवेश

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोल्हापूर महानगरपालिकेत दोन वेळा नेतृत्व केलेल्या कोल्हापूरच्या माजी महापौर सई खराडे यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला आहे. ठाणे येथे आयोजित पक्षप्रवेश सोहळ्यात स्वतः एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्यांचा पक्षप्रवेश झाला आहे, या कार्यक्रमाला कोल्हापूर उत्तरचे आमदार राजेश क्षीरसागर यांच्यासह जिल्ह्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते.**

सई खराडे यांच्यासोबत त्यांचे चिरंजीव शिवतेज खराडे यांचाही शिंदे गटात प्रवेश झाला आहे.सई खराडे यांनी कोल्हापूर महानगरपालिकेत दोन वेळा प्रतिनिधित्व केले असून, २००५ साली त्यांनी महापौरपदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. शिवाजी पेठ विभागातून त्यांनी दोन कार्यकाळ नगरसेवक म्हणून काम केले आहे. कृषिभूषण कै. महिपतराव (पापा) बेंद्रे यांच्या कन्या आणि माजी नगराध्यक्ष कै. सखारामबापू खराडे यांच्या स्नुषा म्हणून त्यांचा राजकीय वारसा भक्कम मानला जातो. त्यांच्या प्रशासनिक कार्याची माहिती असलेल्या मतदारांमध्ये आजही त्यांची छाप कायम आहे. त्यांच्या



प्रवेशामुळे कोल्हापूरमधील शिंदे गटाची ताकद वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. स्थानिक पातळीवर शिंदे गट मजबूत करण्यासाठी नेतृत्व सातत्याने प्रयत्नशील असून, सई खराडे यांचे अनुभव, जनसंपर्क आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व पक्षासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. जिल्हा आणि राज्यस्तरीय नेत्यांची उपस्थिती लक्षवेधी ठरणार असून, या प्रवेशामुळे कोल्हापूरच्या राजकारणातील समीकरणे बदलण्याची चिन्हे स्पष्ट

### शिवतेज खराडे शिंदे गटात

चिरंजीव शिवतेज खराडे यांचाही शिंदे गटात प्रवेश झाला आहे.सई खराडे यांनी कोल्हापूर महानगरपालिकेत दोन वेळा प्रतिनिधित्व केले असून, २००५ साली त्यांनी महापौरपदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. शिवाजी पेठ विभागातून त्यांनी दोन कार्यकाळ नगरसेवक म्हणून काम केले आहे.

दिसत आहेत. सई खराडे यांच्या प्रवेशामुळे आगामी कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकांसह स्थानिक राजकारणात शिंदे गट अधिक सक्रिय होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे पक्षाला नवी ऊर्जा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.कोल्हापूर महानगरपालिकेत दोन वेळा नेतृत्व केलेल्या कोल्हापूरच्या माजी महापौर सई खराडे यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला आहे. ठाणे येथे आयोजित पक्षप्रवेश सोहळ्यात स्वतः एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्यांचा पक्षप्रवेश झाला आहे, या कार्यक्रमाला कोल्हापूर उत्तरचे आमदार राजेश क्षीरसागर यांच्यासह जिल्ह्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## नियम पाळणे बंधनकारक

## नाईट क्लब्ससाठी ‘मार्गदर्शक सूचना’ जारी

# गोवा अग्निकांड: सरकार ॲक्शन मोडवर!

## रेस्टॉरंट्ससाठी कठोर नियमावली जारी



| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गोव्यातील नाईट क्लबमध्ये लागलेल्या आगीच्या घटनेनंतर, ज्यात २५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला, गोवा राज्य आपत्कालीन व्यवस्थापन प्राधिकरणाने कठोर भूमिका घेतली आहे. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या (DM ACT, 2005) कलम २२(२)(H), २२(२)(I) आणि २४ अंतर्गत, SDMA ने राज्यातील सर्व नाईट क्लब्स, रेस्टॉरंट्स, बार, इव्हेंट व्हेन्यू आणि तत्सम आस्थापनांसाठी नवी मार्गदर्शक सूचना (ADVISORY) जारी केली आहे.**

SDMA ने स्पष्ट केले आहे की, सर्व आस्थापनांना अग्निसुरक्षा, इलेक्ट्रिकल सुरक्षा, आपत्कालीन तयारी आणि संरचनात्मक सुरक्षा मानकांचे कठोरपणे पालन करणे अनिवार्य असेल.सर्व आस्थापनांना ७ दिवसांच्या आत आपले अंतर्गत सुरक्षा ऑडिट पूर्ण करून, त्याचा अहवाल जिल्हा प्रशासन, अग्निशमन सेवा किंवा SDMA च्या पथकांच्या तपासणीसाठी तयार ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. SDMA ने स्पष्ट चेतावणी दिली आहे की, या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केल्यास कडक कारवाई केली जाईल, ज्यात आस्थापना बंद करणे, परवाना निलंबित/रद्द करणे आणि DM ACT, 2005 च्या कलम ५१(B) व इतर संबंधित कायद्यांनुसार अभियोजन समाविष्ट असेल. हे निर्देश तात्काळ प्रभावाने लागू झाले आहेत.गोवा येथील अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा (FIRE AND EMERGENCY SERVICES) संचालक, नितीन व्ही. रायकर यांनी स्पष्ट केले की, क्लबकडे आग प्रतिबंधक उपायांसाठी आवश्यक असलेले NOC नव्हते. अग्निशमन विभागाने या क्लबला काम करण्यासाठी कधीही ‘फायर NOC’ जारी केले नव्हते. दुर्घटना घडल्यानंतर नाईट क्लबच्या व्यवस्थापकाला (MANAGER) अटक करण्यात आली आहे.गोव्यामध्ये आगीची भीषण घटना घडली असून यामुळे संपूर्ण देशातून हळहळ व्यक्त होत आहे. गोव्यातील अर्पोरामध्ये एका नाईट क्लबमध्ये आगीची (FIRE NEWS) मोठी दुर्घटना घडली. उत्तर गोव्यातील (GOA NEWS) या घटनेमध्ये 25 जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. सिलिंडरचा स्फोट झाल्यामुळे ही दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. या दुःखद घटनेनंतर मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी घटनास्थळी भेट दिली आणि चौकशीचे आदेश दिले. या प्रकरणी आता संबंधितांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.उत्तर गोव्यात झालेल्या या नाईटक्लब आगीत २३ जणांचा गुदमरून मृत्यू झाला, तर दोन जण भाजल्याने मृत्युमुखी पडले. उत्तर गोव्यातील अर्पोरा येथील बर्च बाय रोमियो लेन नाईटक्लबमध्ये लागलेल्या आगीत एकूण २५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती गोवा पोलिसांनी दिली. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, मृतांमध्ये चार पर्यटक आणि १४ नाईटक्लब कर्मचाऱ्यांचा समावेश आहे, तर सात जणांची ओळख पटवणे अद्याप बाकी आहे. दरम्यान, बर्च बाय रोमियो लेन नाईटक्लबच्या मॅनेजरला अटक करण्यात आली आहे.गोव्यातील या आगीमध्ये २३ जणांचा मृत्यू गुदमरून झाला, तर २ जण भाजल्याने झाले. तर तिघांचे मृतदेह गंभीर जळालेल्या अवस्थेत आढळले. याचा अर्थ असा की आगीत भाजल्यामुळे फक्त तीन जणांचा मृत्यू झाला, तर उर्वरित लोक विषारी धुरामुळे मरण पावले. गोवा पोलिसांच्या म्हणण्यानुसार, रात्री १ वाजण्याच्या सुमारास नाईटक्लबच्या स्वयंपाकघराजवळ गॅस सिलिंडरचा स्फोट झाला. स्फोट इतका जबरदस्त होता की काही क्षणातच आग संपूर्ण इमारतीत पसरली.

### पंतप्रधान मोदींनी व्यक्त केले दुःख

प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की स्फोटाच्या वेळी आत नियमित तयारी आणि बंद करण्याचे काम सुरू होते. गॅस गळतीमुळे स्फोट झाला.या प्रकरणावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत शोक व्यक्त केला. पंतप्रधान मोदींनी लिहिले की, गोव्यातील अर्पोरा येथील आगीची दुर्घटना अत्यंत दुःखद आहे.

# इंडिगोचे संकट सलग सहाव्या दिवशी कायम!

## प्रवाशांना दिला 610 कोटींचा परतावा ; 650 हून अधिक उड्डाणे रद्द

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशातील सर्वात मोठी एअरलाइन कंपनी इंडिगोचे (INDIGO) परिचालन संकट (OPERATIONAL CRISIS) सलग सहाव्या दिवशीही कायम आहे. इंडिगोने आज, म्हणजेच रविवारी, पुन्हा ६५० हून अधिक विमाने रद्द केली आहेत. कंपनीने नियोजित केलेल्या २३०० देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांपैकी सुमारे १६५० उड्डाणे आज ऑपरेट केली जात आहेत.**

दरम्यान, नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने रविवारी सांगितले की, इंडिगोच्या प्रवाशांना आतापर्यंत एकूण ₹६१० कोटी रुपयांचा REFUND (परतावा) केला गेला आहे. तसेच, कंपनीने देशभरातील प्रवाशांना त्यांच्या ३००० हून अधिक बॅग्ज देखील सुपूर्द केले आहेत.

शुक्रवार आणि शनिवार: सीईओ पीटर एल्बर्स यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी १००० हून अधिक, तर शनिवारी ८०० हून अधिक विमाने रद्द झाली होती. इंडिगोचे सीईओ पीटर एल्बर्स यांनी सांगितले की, कंपनी हळूहळू सामान्य परिस्थितीकडे परतत आहे. “आम्ही आता उड्डाणे पहिल्या टप्प्यातच रद्द करत आहोत, जेणेकरून ज्या प्रवाशांची उड्डाणे रद्द झाली आहेत,



ते विमानतळावर येऊ नयेत,” असे त्यांनी स्पष्ट केले.डीजीसीएने (DGCA) पायलटच्या ‘फ्लाईट ड्युटी टाइम लिमिट’ (FDTL) नियमांमध्ये केलेल्या बदलांमुळे हे भीषण संकट उभे राहिले. नवीन नियमांनुसार, वैमानिकांना दर आठवड्याला मिळणारा ३६ तासांचा ब्रेक वाढवून ४८ तास करण्यात आला आहे. तसेच, रात्रीच्या वेळेत ऑपरेट केल्या जाणाऱ्या विमानांची संख्या २ पर्यंत मर्यादित करण्यात आली. या नियमांमुळे प्रत्येक वैमानिकाकडून ऑपरेट केल्या जाणाऱ्या विमानांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली.इंडिगोने ‘एअरबस ए३२० फ्लीट’साठी २४२२ कॅप्टनची आवश्यकता असल्याचे सांगितले होते, पण त्यांच्याकडे केवळ २३५७ कॅप्टन उपलब्ध होते. तसेच, ‘फर्स्ट ऑफिसर’ची संख्याही कमी होती. इंडिगोचे ”लीन-स्टाफिंग” (LEAN-STAFFING MODEL – कमी कर्मचारी संख्या ठेवून कार्य चालवण्याचे मॉडेल) या नवीन DGCA नियमांमुळे पूर्णपणे कोलमडले, परिणामी दररोज शेकडो विमाने रद्द करावी लागली. देशातील सर्वात मोठी एअरलाइन कंपनी इंडिगोचे (INDIGO) परिचालन संकट सलग सहाव्या दिवशीही कायम आहे.

### शुक्रवारपासून संकटाची सुरुवात

इंडिगोने आज, म्हणजेच रविवारी, पुन्हा ६५० हून अधिक विमाने रद्द केली आहेत. कंपनीने नियोजित केलेल्या २३०० देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांपैकी सुमारे १६५० उड्डाणे आज ऑपरेट केली जात आहेत.दरम्यान, नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने रविवारी सांगितले की, इंडिगोच्या प्रवाशांना आतापर्यंत एकूण ₹६१० कोटी रुपयांचा REFUND (परतावा) केला गेला आहे.

# हृषिकेश जोशींच्या 'बोलविता धनी'ची जोरदार चर्चा

प्रसिद्ध अभिनेते, लेखक आणि दिग्दर्शक हृषिकेश जोशी (HRISHIKESH JOSHI) यांच्या आगामी 'बोलविता धनी' (BOLAVITA DHANI) या नाटकाची सध्या नाट्यवर्तुळात जोरदार चर्चा आहे. प्रवीण भोसले, भरत नारायणदास ठक्कर, समृद्धी तांबे, गंधाली कुलकर्णी आणि सुनंदा काळुसकर यांची निर्मिती असलेल्या या नाटकाचे लेखन आणि दिग्दर्शन स्वतः हृषिकेश जोशी यांनी केले आहे. या नाटकात महत्त्वपूर्ण भूमिका साकारणारा अभिनेता क्षितीश दाते (KSHITISH DATE) याने आपल्या भूमिकेबद्दल आणि हृषिकेश जोशींसोबतच्या कामाच्या अनुभवाविषयी मोकळेपणाने संवाद साधला.क्षितीश दातेने या नाटकात दोन अत्यंत वेगळ्या भूमिका साकारल्या आहेत. तो सांगतो की, "या दोन्ही भूमिका एकमेकांपेक्षा खूप वेगळ्या आहेत. एकाच वेळी दोन वेगळी माणसं एकापाठोपाठ एक उभी करणं हे माझ्यासाठी थोडं आव्हानात्मक आहे." 'बोलविता धनी' या शीर्षकाचा अर्थ नाटकात वेगवेगळ्या पद्धतीने लागतो. क्षितीशच्या मते, "बोलविता धनी म्हणजे बोलणारा किंवा कृती करणारा एक असतो, पण पडद्यामागे राहून त्याला सूचना देणारा दुसराच कोणी असतो." विशेष म्हणजे, लोकमान्य टिळक किंवा एकनाथ शिंदे यांसारख्या नेतृत्वादी व्यक्तिरेखांच्या तुलनेत या नाटकात त्याची भूमिका कनिष्ठ पदाची आहे, पण



अभिनेता म्हणून हेच आव्हान अधिक रंजक असल्याचे तो मानतो.हृषिकेश जोशींसोबत काम करण्याच्या अनुभवावर क्षितीश दाते खूप उत्साही आहे. "मला हृषिकेश जोशींचं लिखाण प्रचंड आवडतं. त्यांची सगळी नाटकं मी पाहिली आहेत. शिवाय सध्या सुरू असलेल्या 'मी व्हर्सेस मी' या नाटकातही आम्ही एकत्र काम करतोय. त्यामुळे त्याने मला या नाटकासाठी फोन केला, तेव्हा मी काहीही विचार न करता लगेच हो बोलून टाकलं." हृषिकेश यांच्या निवडक विनोदी शैलीमुळे हे नाटक सहकुटुंब पाहता येईल असे आहे. क्षितीश म्हणाला की, हृषिकेशने १३ जणांची ही संपूर्ण टीम एकत्र आणली आहे; त्यांची कलाकार निवडीची पारख खूप चांगली आहे. हे नाटक "कोणाच्याही खिजगणतीत नाही अशा जुन्या नाटकांच्या इतिहासातल्या एका महत्त्वाच्या प्रसंगावरती भाष्य करतं." या नाटकात ओंकार कुलकर्णी, संग्राम साळवी यांच्यासह एकूण १३ कलाकार आहेत. १३ जणांना एकत्रित पाहण्याची मजा रसिकांना नक्कीच अनुभवायला मिळेल आणि 'बोलविता धनी' हे नाटक नाट्यरसिकांसाठी १०० टक्के पर्वणी असेल, असा विश्वास क्षितीश दातेने व्यक्त केला.प्रसिद्ध अभिनेते, लेखक आणि दिग्दर्शक हृषिकेश जोशीयांच्या आगामी 'बोलविता धनी' (BOLAVITA DHANI) या नाटकाची सध्या नाट्यवर्तुळात जोरदार चर्चा आहे. प्रवीण भोसले, भरत नारायणदास ठक्कर, समृद्धी तांबे, गंधाली कुलकर्णी आणि सुनंदा काळुसकर यांची निर्मिती असलेल्या या नाटकाचे लेखन आणि दिग्दर्शन स्वतः हृषिकेश जोशी यांनी केले आहे.

## नॅशनल क्रशचे साडी कलेक्शन चर्चेत

गिरिजा ओक गोडबोले काही दिवसांपासून चर्चेत आहे. ही मराठी अभिनेत्री रातोरात नॅशनल क्रश बनली,गिरिजा ओकचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि ती नॅशनल क्रश बनली. निळ्या रंगाची साडी नेसलेला फोटो व्हायरल झाला तिच्या या सुंदर आणि पारंपारिश शैलीचे चाहत्यांनी खुप कौतुक देखील केले आहे. अलिकडेच तिने 'द लल्लनटॉप'ला मुलाखत दिली होती. तिचा साधा पण आकर्षक पेहराव, बोलणे आणि सुलभपणा यामुळे तिने प्रेक्षकांचे मन जिंकले.अभिनेत्री गिरीजा ओकने नुकतेच हॉटरफ्लायशी संवाद साधला. अभिनेत्रीने तिच्याजवळच्या काही साड्यादेखील दाखवल्या.बोलताना गिरीजाने आपल्या साडी प्रेमाबद्दल मोठा खुलासा केला. तिने सांगितले की, तिच्याकडे 400 पेक्षा अधिक साड्या आहेत.यावेळी तिने तिच्या आवडत्या साड्या दाखवल्या. यात तिच्या आई आणि आजींकडून वारशाने मिळालेल्या साड्या देखील आहे.

## साक्षी चांगलीच फसली!

'ठरलं तर मग' मालिकेत सध्या आश्रम केसच्या निकालाचा काऊंटडाऊन सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. मालिका सुरू झाल्यापासून गेली अडीच वर्षे सायली-अर्जुन मधुभाऊंना निर्दोष सोडवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. मात्र, आता कोर्टाने दिलेल्या आदेशानुसार जुलै महिन्यात काहीही करून या केसचा अंतिम निकाल लावण्यात येणार आहे. 'ठरलं तर मग' मालिकेत आता आश्रम केसचा निकाल लागण्यासाठी फक्त २१ दिवस उरले आहेत. याचदरम्यान, अर्जुन एक मोठा डाव खेळणार आहे. काही दिवसांपूर्वीच अर्जुन आणि सायलीने साक्षी शिखरेच्या घरी जाऊन पुराव्यांची शोधाशोध केली होती. यावेळी त्यांच्या हाती साक्षीच्या पेंडटचा अर्धा तुकडा सापडला होता आणि आता अर्जुनच्या हाती आणखी एक मोठा पुरावा लागणार आहे. यामुळे मालिकेत निर्णायक वळण येणार आहे.अर्जुनच्या हाती साक्षी शिखरेचे कॉल डिटेल्स लागले आहेत. तिच्या फोन कॉलच्या रिपोर्टनुसार खूनाच्या रात्री साक्षीचं लोकेशन वात्सल्य आश्रमाजवळचं असतं. अर्जुन सायलीला म्हणतो, "साक्षी आश्रमाजवळ होती हे या रिपोर्ट्समधून स्पष्ट होतंय..." यावर सायली म्हणते, "हे रिपोर्ट्स पाहून साक्षी खोटं बोललीये फक्त एवढंच सिद्ध होतंय."अर्जुन पुढे म्हणतो, "हे फोनकॉलचे रिपोर्ट्स आपण कोर्टात सादर केल्यावर दामिनी पलटवार नक्की करणार...आणि



## माझ्याबद्दल नकारात्मक बोललं गेलं

लोकप्रिय अभिनेते रजनीकांत यांनी आजवर अनेक बॉलीवूड आणि दाक्षिणात्य चित्रपटांतून वैविध्यपूर्ण भूमिका साकारत प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. त्यांनी त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात जणू घर केलं आहे. बॉलीवूडसह दाक्षिणात्य इंडस्ट्रीतही काम केल्याने त्यांचा चाहतावर्ग खूप मोठा आहे. चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहेत. रजनीकांत यांनी आजवर अनेक कलाकारांसह काम केलं आहे. तर बऱ्याच नवीन कलाकारांना त्यांच्याबरोबर एकदा तरी काम करण्याची संधी मिळावी असं वाटत असतं. रजनीकांत यांच्या कामाची एक पद्धत आहे आणि या पद्धतीबद्दल त्यांनी आपलं मत व्यक्त केलं होतं. रजनीकांत यांनी त्यांच्या 'काला' चित्रपटाच्या म्युझिक लॉंचदरम्यान काम करण्याच्या पध्दतीबद्दल सांगितलं होतं. 'पिंकव्हिला'च्या वृत्तानुसार यावेळी रजनीकांत म्हणालेले, "ते त्यांच्यापेक्षा लहान वयाच्या अभिनेत्रींसह काम करत नाही". ते म्हणाले होते, "मी ६५ वर्षांचा अभिनेता आहे. त्यामुळे मी माझ्यापेक्षा अर्ध्या वयाच्या अभिनेत्रींसह रोमॅंटिक सीन नाही केले पाहिजे. गेल्या ४० वर्षांपासून लोक म्हणत आहेत की, माझं करिअर संपुष्टात वगैरे आलं; पण देवाच्या आणि प्रेक्षकांच्या आशीर्वादाने मी आजही काम करत आहे".



## छोट्या पडद्यावरील प्रसिद्ध अभिनेत्री झाली ट्रोल

अनेकदा सामाजिक मुद्द्यांवर कलाकारांनी व्यक्त व्हावं, त्यांनीसुद्धा त्यावर त्यांची मतं मांडावीत, अशी अपेक्षा प्रेक्षकांना कलाकारांकडून असते. परंतु, काही कलाकार अशा मुद्द्यांवर थेट प्रतिक्रिया देतात; तर काही त्यावर काहीच वक्तव्य न करणं योग्य समजतात. पण त्यामुळे अशा कलाकारांना काही वेळा ट्रोलिंगचा सामना करावा लागतो. असंच काहीसं छोट्या पडद्यावरील एका प्रसिद्ध अभिनेत्रीबरोबर घडल्याचं तिनं एका मुलाखतीमधून सांगितलं आहे. गुजरातच्या अहमदाबाद येथे १२ जूनला विमान कोसळून मोठ्या अपघाताची दुर्दैवी घटना घडली. त्यामध्ये अनेकांना जीव गमवावे लागले. त्या दुर्घटनेनंतर अनेक कलाकारांनी त्याबाबत सोशल मीडियामार्फत हळहळ व्यक्त केली. परंतु, या संदर्भात आपल्याला काहीच माहीती नव्हती आणि त्यामुळे अभिनेत्री रीम शेखला ट्रोल करण्यात आल्याचं तिनं स्वत: सांगितलं आहे. रीमनं 'हिंदी रश'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये याबाबतची माहिती दिली आहे.लाफ्टर शेफ'च्या सेटवर असताना अभिनेत्रीला अहमदाबाद विमान अपघाताबद्दल विचारण्यात आलं होतं. पण, याबाबत तिला काहीच माहीत नव्हतं. त्यामुळे तिनं कुठलीही प्रतिक्रिया दिली नाही. परंतु, तिचा हा व्हिडीओ तेव्हा खूप व्हायरल झालेला आणि तिला सोशल मीडियावर प्रचंड ट्रोल केलं गेलं. याबाबत आता अभिनेत्रीनं मुलाखतीमध्ये तिची प्रतिक्रिया दिली आहे.रीम शेख म्हणाली, "तेव्हा खूप पटकन सगळ्या गोष्टी झाल्या. मी सेटवर आले आणि कोणीतरी मला अचानक काल जे घडलं,त्याबद्दल सांग असं विचारलं. सकाळी ७:३० वाजता तुम्ही जेव्हा सेटवर येता तेव्हा तुम्हाला तासाभरात तयार व्हायचं असतं. त्यावेळी ४-५ लोक तुमच्यामागे असतात आणि त्यामुळे तेव्हा तुम्ही खूप गोंधळलेले असता. वेळही खूप कमी असतो".

व्हिडिओ खूप वेगाने व्हायरल

## विशाखापट्टणममधील प्रसिद्ध सिंहचलम मंदिराला भेट

# कोहली झाला भक्तीत विलीन!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दक्षिण आफ्रिकेविरुद्ध काल भारताची एकदिवसीय मालिका पार पडली. या मालिकेमध्ये भारताच्या संघाने शेवटच्या सामन्यामध्ये विजय मिळवला आणि मालिकेचे जेतेपद नावावर केले होते. या मालिकेमध्ये भारताचा स्टार खेळाडू विराट कोहली याने धुव्वाधार कामगिरी केली. एकदिवसीय मालिकेच्या पहिल्या दोन्ही सामन्यामध्ये त्याने शतके झळकावली तर शेवटच्या सामन्यामध्ये त्याने अर्धशतक झळकावले आणि शेवटचा चौकार मारुन टीम इंडियाला विजय मिळवून दिला.**

## कोहलीच्या हातात फुलांचा हार



दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत प्रभावी कामगिरी केल्यानंतर, विराट कोहली भक्तीत डुंबला आहे. मालिका जिंकल्यानंतर किंग कोहलीने विशाखापट्टणममधील प्रसिद्ध सिंहचलम मंदिराला भेट दिली. मंदिरात पोहोचलेल्या विराटचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर खूप वेगाने व्हायरल होत आहे. तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात कोहलीची बॅट पुन्हा एकदा गर्जना करत त्याने ४५ चेंडूत ६५ धावांची तुफानी खेळी केली. तीन सामन्यांमध्ये दोन शतके आणि एक अर्धशतक झळकावल्याबद्दल विराटला मालिकावीर म्हणूनही निवडण्यात आले.दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत टीम इंडियाच्या विजयात विराट कोहलीच्या फलंदाजीने महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने तीन सामन्यांमध्ये ३०२ धावा केल्या आणि दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजीचा पूर्णपणे नाश केला. तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यातील विजयानंतर, कोहलीने विशाखापट्टणममधील प्राचीन सिंहचलम मंदिराचे दर्शन घेतले. व्हायरल व्हिडिओमध्ये, कोहलीने पांढरा टी-शर्ट घातला आहे आणि खांद्यावर टॉवेल गुंडाळलेला आहे. कोहलीच्या हातात फुलांचा हार देखील दिसत आहे.तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका विराट कोहलीसाठी उल्लेखनीय होती. रांची येथील पहिल्या एकदिवसीय सामन्यात विराट कोहलीने शानदार फलंदाजी केली आणि १२० चेंडूत १३५ धावा केल्या. रायपूर येथेही किंग कोहलीने ९३ चेंडूत १०२ धावा केल्या. मालिकेतील शेवटच्या सामन्यात, टीम इंडियाचा स्टार फलंदाज वेगळ्याच लयीत होता, त्याने फक्त ४५ चेंडूत ६५ धावा केल्या. त्याच्या खेळीदरम्यान, कोहलीने सहा चौकार आणि तीन उत्तुंग षटकार ठोकले. यशस्वी जयस्वालसोबत त्याने दुसऱ्या विकेटसाठी अखंड शतकी भागीदारी केली, ज्यामुळे टीम इंडियाने ३९.५ षटकांत फक्त एक विकेट गमावून २७१ धावांचे लक्ष्य गाठले. यशस्वीने त्याचे पहिले एकदिवसीय शतक झळकावले आणि तो ११६ धावांवर नाबाद राहिला. रोहित शर्मानेही ७५ धावा केल्या.दक्षिण आफ्रिकेविरुद्ध काल भारताची एकदिवसीय मालिका पार पडली. या मालिकेमध्ये भारताच्या संघाने शेवटच्या सामन्यामध्ये विजय मिळवला आणि मालिकेचे जेतेपद नावावर केले होते. या मालिकेमध्ये भारताचा स्टार खेळाडू विराट कोहली याने धुव्वाधार कामगिरी केली. एकदिवसीय मालिकेच्या पहिल्या दोन्ही सामन्यामध्ये त्याने शतके झळकावली तर शेवटच्या सामन्यामध्ये त्याने अर्धशतक झळकावले आणि शेवटचा चौकार मारुन टीम इंडियाला विजय मिळवून दिला.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत प्रभावी कामगिरी केल्यानंतर, विराट कोहली भक्तीत डुंबला आहे. मालिका जिंकल्यानंतर किंग कोहलीने विशाखापट्टणममधील प्रसिद्ध सिंहचलम मंदिराला भेट दिली. मंदिरात पोहोचलेल्या विराटचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर खूप वेगाने व्हायरल होत आहे. तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात कोहलीची बॅट पुन्हा एकदा गर्जना करत त्याने ४५ चेंडूत ६५ धावांची तुफानी खेळी केली.

## कोहली मंदिरात पोहोचले

तीन सामन्यांमध्ये दोन शतके आणि एक अर्धशतक झळकावल्याबद्दल विराटला मालिकावीर म्हणूनही निवडण्यात आले.दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत टीम इंडियाच्या विजयात विराट कोहलीच्या फलंदाजीने महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने तीन सामन्यांमध्ये ३०२ धावा केल्या आणि दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजीचा पूर्णपणे नाश केला. तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यातील विजयानंतर, कोहलीने विशाखापट्टणममधील प्राचीन सिंहचलम मंदिराचे दर्शन घेतले.

# अर्शदीपने विराट कोहलीला केले ट्रोल

## विराट-अर्शदीपचा व्हिडिओ पाहून तुम्हाला हसू आवरणार नाही

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**टीम इंडियाने विझागमधील तिसरा एकदिवसीय सामना जिंकला. हा मालिकेचा शेवटचा सामना भारताच्या संघाने 61 चेंडू शिल्लक असताना जिंकला आहे. त्यासामन्याआधी भारताच्या संघाने 2 वर्षापासून एकही टॉस जिंकला नव्हता ही चकित करणारी गोष्ट आहे.**



मागील २० एकदिवसीय सामन्यांमध्ये भारत नाणेफेक गमावत होता. तथापि, विझागमध्ये टीम इंडियाचे नशीब बदलले, कारण त्यांनी नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दवमुळे टीम इंडियाला दुसरी फलंदाजी करण्याचा फायदा झाला आणि नऊ विकेट्स शिल्लक असताना सामना जिंकला. विराट कोहलीने पहिल्या दोन एकदिवसीय सामन्यात शतके झळकावली आणि तिसऱ्या सामन्यात ६५ धावांवर नाबाद राहिला. सामन्यानंतरचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये विराट कोहली अर्शदीप सिंगला चिडवत असल्याचे दिसत आहे.अर्शदीप सिंग नियमितपणे त्याच्या सहकारी खेळाडूंसोबत इंस्टाग्रामवर मजेदार व्हिडिओ पोस्ट करतो. आता, विराट कोहलीसोबतचा त्याचा एक व्हिडिओ समोर आला आहे. अर्शदीप सिंग विनोदाने विराटला म्हणाला, “पाजी, शतक पुर्ण करण्यासाठी धावा कमी पडल्या.” जर लक्ष्य जास्त असते तर विराटने तीन सामन्यांमध्ये सलग तिसरे शतक ठोकले असते असे त्याला म्हणायचे होते. विराट कोहलीच्या त्यानंतरच्या प्रतिसादामुळे कोणताही चाहता थांबणार नाही.नाहीतर तुम्ही त्या सर्व दव पडून शतक ठोकणार हे निश्चित होते.” कोहलीचा अर्थ असा होता की जर टीम इंडियाने नाणेफेक जिंकली नसती तर त्यांना प्रथम फलंदाजी करावी लागली असती.

## आपण नाणेफेक जिंकली

अशा परिस्थितीत अर्शदीप सिंगला दुसऱ्या डावात दव पडून गोलंदाजी करावी लागली असती. कोहलीने अर्शदीपची खिल्ली उडवत म्हटले की जर तसे झाले असते तर डावखुरा वेगवान गोलंदाज १०० पेक्षा जास्त धावा देऊ शकला असता.दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत विराट कोहलीने शानदार कामगिरी केली. त्याने तीन सामन्यांमध्ये ३०२ धावा केल्या.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
। सोमवार।
।दि. 8 डिसेंबर 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचा आदर्श !

# राष्ट्र प्रथम...नंतर पार्टी अन् शेवटी स्वत:!

### इच्छुकांसाठीचा अर्ज घेतला रितसर : शहरात "लार्जर दॅन पार्टी" भूमिका घेणाऱ्यांच्या डोळ्यांत अंजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीकडून इच्छुक उमेदवारांसाठी अर्ज वितरण करण्याची प्रक्रिया करण्यात आली. आज शेवटच्या दिशवी 650 हून अधिक इच्छुकांनी अर्ज घेतले आहेत. विशेष म्हणजे, पक्षाचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनीसुद्धा पक्षाच्या शिष्टाचाराप्रमाणे (प्रोटोकॉल) स्वत: इच्छुक असल्याचा अर्ज घेतला आहे. 'राष्ट्र प्रथम...नंतर पार्टी अन् शेवटी स्वत:" हा पक्षाचे धोरण आपल्या कृतीमधून अधोरेखित केले आहे.**




महापालिका निवडणुकीची प्रभाग रचना झाली. त्यानंतर आरक्षण सोडत झाली. भाजपा नेते तथा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी नुकतीच शहरात आढावा बैठक घेतली. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि कोअर कमिटीचे पदाधिकारी उपस्थित होते. पक्षश्रेष्ठींच्या सूचनेप्रमाणे, निवडणुकीसाठी इच्छुकांनी अर्ज घ्यावेत आणि अचूक भरुन पार्टी कार्यालयात निर्धारित वेळेत जमा करावेत. सदर अर्जांची पडताळणीकरुन प्रदेश कार्यालयाकडे पाठवण्यात येतील. याबाबत शहराध्यक्षांनी कार्यवाही करावी, अशा सूचना केल्या होत्या.

दरम्यान, भाजपाकडून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुकांची झुंबड उडाली आहे. शहरातील एकूण 128 जागांवर निवडणूक होत आहे. मात्र, मोरवाडी, पिंपरी येथील जनसंपर्क कार्यालयातून आतापर्यंत 650 हून अधिक इच्छुकांनी अर्ज घेतले आहे. दुसरीकडे, काही इच्छुकांनी अद्याप पक्ष शिष्टाचाराप्रमाणे इच्छुक उमेदवारीबाबत अर्ज घेतलेले नाहीत. त्यांनी निर्धारित वेळेत अर्ज घ्यावेत, असे आवाहन संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे यांनी केले आहे.

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे आपला बालेकिल्ला महानगरपालिका प्रभाग क्रमांक 28 म्हणजे फाईव्ह गार्डन, शिवार गॉर्डन, प्लॅनेट मिलेनीयम, कापसे लॉन, रामनगर, पिंपळे सौदागर, कुणाल आयकॉन, रोझ आयकॉन, गोविंद गार्डन या भागातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. शहराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर त्यांनी अवघ्या 6 महिन्यांत शहरात 200 हून अधिक कार्यक्रम व उपक्रम घेतले आहेत. कार्यकर्त्यांचे "प्रभावी संघटन, जनसेवा, पक्षनिष्ठा आणि शेवटच्या घटकांचा विकास" या चार सूत्रांवर काम सुरू आहे. कार्यकारिणी निवडताना त्यांनी शहर पातळीवर काम करू इच्छिणाऱ्या तीनशेपेक्षा अधिक कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या व त्यामधून आपल्या 'टीम'ची बांधणी केली. यांची पक्ष पातळीवर राज्य स्तरावर नोंद घेतली होती.

> "भाजपा शिस्तप्रिय पक्ष आहे. निवडणूक असो किंवा संघटन पक्ष शिष्टाचार हा शिरोभागी असतो. मी प्रभाग 28 मधून निवडणूक लढवण्यास इच्छुक आहे. त्यामुळे पक्षाच्या कार्यप्रणालीनुसार इच्छुक उमेदवारी अर्ज घेतला. बहुतांशी इच्छुकांनी अर्ज घेतलेले आहेत. उर्वरित उमेदवारांनीसुद्ध अर्ज घ्यावेत आणि पक्षश्रेष्ठींनी दिलेल्या निर्धारित मुदतीमध्ये जमा करावेत. त्याची पडताळणी करुन ते प्रदेश कार्यालयाकडे सादर करण्यात येतील. ऐनवेळी आलेल्या अर्जांचा विचार होणार नाही. त्यानंतर पक्षाचे गोपनीय सर्व्हे, निवडून येण्याची क्षमता आणि पक्ष कार्यातील सक्रियता याच्या आधारे पक्षश्रेष्ठी उमेदवारी निश्चित करतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण व पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली आम्ही पुन्हा एकदा पिंपरी-चिंचवड महापालिकेवर 'कमळ' फुलेल, असा विश्वास आहे.
>
> **–शत्रुघ्न काटे,** शहराध्यक्ष, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणात सह दुय्यम निबंधक गजाआड

### बावधन पोलिसांनी केली अटक; 40 हेक्टर जागेच्या खरेदी-विक्री घोटाळा

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने खरेदी केलेल्या मुंढवा येथील 40 हेक्टर जागेच्या खरेदी-विक्री घोटाळा प्रकरणात दस्त नोंदणी करणाऱ्या सह दुय्यम निबंधकाला बावधन पोलिसांनी रविवारी (दि . ७) अटक केली. भोर येथील त्याच्या निवासस्थानावरून त्याला ताब्यात घेण्यात आले.**

रवींद्र बाळकृष्ण तारू (वय ५८, रा. भोर) असे अटक केलेल्या दुय्यम निबंधकाचे नाव आहे. याप्रकरणी सह जिल्हा निबंधक वर्ग 1 अधिकारी संतोष अशोक हिंगाणे यांनी बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणात जमीन विक्रीबाबत कुलमुखत्यार पत्र असलेली महिला शीतल किशनचंद तेजवाणी, पार्थ पवार यांची भागीदारी असलेल्या अमेडिया इंटरप्रायजेस एलएलपी कंपनीचे भागीदार दिग्विजय अमरसिंह पाटील आणि दस्त नोंदणी करणारे सह दुय्यम निबंधक रवींद्र बाळकृष्ण तारू या तिघांविरुद्ध बावधन पोलिस ठाण्यात ६ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. २० मे २०२५ रोजी सह दुय्यम निबंधक कार्यालय, हवेली क्र. ४ येथे हा व्यवहार झाला होता. शीतल तेजवानी आणि दिग्विजय पाटील यांनी परस्पर संगनमत करून मुंढवा येथील या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर भोगवटदाराचे नाव "मुंबई सरकार" असल्याचे माहिती असतानाही व आवश्यक शासन परवानगी न घेता व्यवहार केला. शासनाच्या नियमांनुसार या जमिनीचा खरेदी-विक्री दस्त करताना ५ कोटी ८९ लाख ३१ हजार रुपये इतके मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक होते. तरीही आरोपींनी संगनमत करून शासनाला देय असलेले सुमारे ६ कोटी रुपये मुद्रांक शुल्क न भरता फसवणूक केली. या प्रकरणात यापूर्वी शितल तेजवानी हिला पुणे पोलिसांनी अटक केली असून ती सध्या पोलीस कोठडीत आहे.

आता सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू याला अटक झाली आहे. त्यामुळे या या गुन्ह्यात आरोपी असलेले दिग्विजय पाटील यांना कधीही अटक होऊ शकते.

## मिशन PCMC: मतदार यादीतील घोळाबाबत

# शरद पवार यांच्याकडे निवेदन!

### बारामती–इंदापूर मतदारसंघातील दाम्पत्याची पुण्यात भेट : मतदार यादी दुरूस्तीची मागणी

।पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पुणे : मतदार यादीतील गंभीर अनियमितता, नावे वगळणे आणि नोंद प्रक्रिया सतत बिघडत असल्याबाबत शहरातील नागरिकांमध्ये वाढलेल्या नाराजीची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते शरदचंद्र पवार यांनी रविवारी पुण्यात विशेष बैठक घेतली. बारामती आणि इंदापूर मतदारसंघातील राबिया शेख आणि युनूस शेख या दाम्पत्याने आपले नाव विनामागणी दुसऱ्या मतदारसंघात टाकल्याच्या तक्रारीसह पवार यांची भेट घेतली.**

या भेटीस पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष तुषार कामठे, युवक शहराध्यक्ष इम्रान शेख तसेच पदाधिकारी उपस्थित होते. मतदार यादीत मोठ्या प्रमाणावर नावे वगळणे, चुकीची स्थलांतर नोंद, नव्या मतदार नोंदणी प्रक्रियेत होणारा विलंब आणि त्यातून सर्वसामान्यांना भोगावा लागणारा त्रास याबाबत या प्रतिनिधीमंडळाने पवारांसमोर सविस्तर मांडणी केली. बैठकीत पवारांनी विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित प्रशासनाकडून तात्काळ दुरुस्ती करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. नागरिकांना त्यांच्या घटनात्मक मतदानाधिकारापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी योग्य ती पावले उचलली जातील, अशी माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली. शहराध्यक्ष तुषार कामठे यांनीही मतदार यादीतील त्रुटी तातडीने दूर करण्याची मागणी केली. यावेळी बोलताना युवक शहराध्यक्ष इम्रान शेख म्हणाले, "इच्छुक उमेदवारांचे किंवा कोणत्याही नागरिकांचे नाव परस्पर एका मतदारसंघातून दुसऱ्यात टाकणे ही लोकशाहीची हत्या आहे. नागरिकांचे मतदानाचे मूलभूत अधिकार हिरावून घेणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी."

> "मतदार यादीतील नावांची मनमानी हलवाजलव ही लोकशाही प्रक्रियेवरील सरळ आघात आहे. नागरिकांच्या मतदानाच्या हक्काशी असा खेळ चालणार नाही. दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, हीच आमची ठाम भूमिका आहे."
> **–इम्रान शेख,** युवक शहराध्यक्ष, राष्ट्रवादी (श.प.)

या भेटीनंतर प्रशासनावर दबाव वाढण्याची शक्यता असून आगामी निवडणुकीपूर्वी मतदार यादीतील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी अधिक गतीने काम होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे संवर्धन करणे गरजेचे

### अनुराधा साळुंके; महापरिनिर्वाण दिनानिमित्त चऱ्होलीतील तक्षशिला बुद्ध विहारात अभिवादन

।पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी-चिंचवड ।प्रतिनिधी। महापरिनिर्वाण दिनानिमित्त चऱ्होली येथील तक्षशिला बुद्ध विहारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक कार्यकर्ते अनुराधा साळुंके आणि दीपक साळुंके यांनी उपस्थित महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. भारताचे संविधान निर्माते, मानवतावादी विचारवंत तथा बहुजनांचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.**

कार्यक्रमाच्या सुरुवातीस बुद्ध वंदना, त्रिसरण आणि पंचशील पठण करण्यात आले. त्यानंतर डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे महत्व अधोरेखित करणारे उद्बोधन करण्यात आले. भारतीय लोकशाहीचे बळकटीकरण, सामाजिक समानता, शिक्षणाचा प्रसार आणि मानवी हक्कांची जपणूक हे बाबासाहेबांनी दिलेले मूल्य कोणत्याही काळात तितक्याच सामर्थ्याने लागू असल्याचे साळुंके दाम्पत्यांनी सांगितले.

दीपक साळुंके यांनी आंबेडकरी चळवळीची परंपरा कायम ठेवण्याचे आवाहन केले. "समतामूलक समाजाची निर्मिती ही बाबासाहेबांची स्वप्ने होती. आजच्या पिढीने त्या विचारांचे संवर्धन करणे अत्यंत गरजेचे आहे," असे ते म्हणाले. कार्यक्रमाला स्थानिक नागरिक उपस्थित होते. स्वच्छता, दीपप्रज्वलन आणि सामूहिक प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली. परिसरात महापरिनिर्वाण दिनानिमित्त भाविकांनी मोठ्या आदराने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्मरण करून सामाजिक बांधिलकीची पुन्हा एकदा जाणीव करून दिली.

> "डॉ. आंबेडकरांनी देशाला दिलेले संविधान हे सामाजिक न्यायाचे सर्वात मोठे हत्यार आहे. त्यांच्या स्मृती जागवून त्यांच्या मार्गदर्शनाने पुढे जाणे हीच खरी अभिवादनाची भावना आहे."
> **–अनुराधा साळुंके,** सामाजिक कार्यकर्त्या.

## ‘हिंदू मंदिरांच्या जमिनी व परिसरातील

# अतिक्रमणांवर कारवाई करा’!

### मंत्री नितेश राणे : महासाधू मोरया गोसावी महाराजांच्या 464 व्या संजीवन समाधी सोहळ्याचे उद्घाटन



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**“धार्मिक स्थळांवरील अतिक्रमण हे पावित्र्यावर आघात असून दोन समाजांत तणाव निर्माण करण्याचे धोकादायक कारण ठरू शकते. हिंदू मंदिरांच्या जागांवर तसेच परिसरात झालेले अतिक्रमण कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही,” अशा स्पष्ट शब्दांत राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी प्रशासनाला कठोर कारवाईचे निर्देश दिले.**

श्रीमन महासाधू मोरया गोसावी महाराजांच्या 464 व्या संजीवन समाधी सोहळ्याचे उद्घाटन राणे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार श्रीरंग बारणे होते. आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी महापौर अपर्णा डोके, माजी नगरसेवक मोरेश्वर शेडगे, सुरेश भोईर, अश्विनी चिंचवडे, राजेंद्र गावडे, नामदेव ढाके, शेखर चिंचवडे, राजाभाऊ गोलांडे, विश्वस्त जितेंद्र देव, ॲड. राजेंद्र उमाप, ॲड. देवराज डहाळे, केशव विद्वांस आदी मान्यवर उपस्थित होते.

राणे म्हणाले की, हिंदू समाजाने दाखवलेला विश्वास हेच आपल्या कार्याचे बळ आहे. धार्मिक स्थळांचे संरक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी असून अतिक्रमणासारख्या गंभीर मुद्द्यांवर प्रशासनाने त्वरेने कार्यवाही करणे अत्यावश्यक आहे. “मोरया स्थानाच्या पावित्र्यात कोणतीही तडजोड होऊ देणार नाही. समाजातील शांतता, सद्भाव आणि धार्मिक समभाव अबाधित ठेवण्यासाठी पवित्र स्थळांचे व त्यांच्या जमिनींचे रक्षण अनिवार्य आहे,” असेही त्यांनी स्पष्ट केले.

**कायदेशीर सल्ला सेवा**

या प्रसंगी चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त जितेंद्र देव यांनी सोहळ्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगत प्रास्ताविक केले. संजीवन समाधीची परंपरा, पवना नदीकाठी समाधीस्थळाची निवड यामागील आध्यात्मिक कारणे, तसेच सोहळ्यातील विविध धार्मिक उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. पवना नदी संवर्धनासाठी समाजाने संयुक्तपणे प्रयत्न करण्याची गरजही त्यांनी मांडली.

आमदार शंकर जगताप यांनी चिंचवड देवस्थानच्या काही महत्त्वपूर्ण मागण्या शासनाकडे प्रलंबित असून त्याचा पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले. खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे आणि अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनीही धार्मिक स्थळांच्या संवर्धनात समाजाच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले.

केशव विद्वांस यांनी आभार प्रदर्शन केले. सूत्रसंचालन मिलिंद कुलकर्णी यांनी केले.

## खंडोबाच्या जेजुरीपर्यंत मेट्रोविस्ताराची मागणी!

### मुख्यमंत्र्यांना विश्वस्तांकडून निवेदन, खंडोबाच्या नगरीला मेट्रो हवी; आर्थिक-पर्यटन विकासाचा मुद्दा पुढे




। पुरंदर ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्राचे कुलदैवत श्री खंडोबा आणि भारतीय लोकदेवतेचे तीर्थक्षेत्र असलेल्या जेजुरीपर्यंत मेट्रोसेवा सुरू करण्याची मागणी वेग धरू लागली आहे. श्री मार्तंड देवस्थानच्या वतीने विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देत ही मागणी केली.**

सध्या राज्य सरकारने पुणे मेट्रोचा विस्तार सासवडपर्यंत करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र सासवडपासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या जेजुरीचे महत्त्व लक्षात घेता मेट्रोमार्गाचा पल्ला जेजुरीपर्यंत वाढविण्यात यावा, अशी विनंती देवस्थानच्या विश्वस्तांनी केली आहे.

जेजुरी हे राज्यातील अत्यंत लोकप्रिय धार्मिक ठिकाण असून दररोज देशभरातून आणि विदेशातून हजारो भाविक आणि पर्यटक येथे भेट देतात. मंदिर परिसरातील उत्सव, जत्रा आणि यात्रा पाहण्यासाठी वर्षभर गर्दी उसळलेली असते. पुणे महानगर क्षेत्रातूनही मोठ्या प्रमाणावर भाविक जेजुरीकडे ये-जा करतात.

मेट्रोचा विस्तार जेजुरीपर्यंत झाला तर तीर्थक्षेत्रासह पर्यटन, आद्योगिक वसाहती आणि स्थानिक व्यवसायांना मोठा आर्थिक फायदा होऊ शकतो, असे खेडेकर यांनी निवेदनात नमूद केले आहे. नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळ या भागाच्या अगदी निकट असल्याने भविष्यातील वाहतूक व्यवस्थेसाठीही हा विस्तार उपयुक्त ठरेल, असा युक्तिवाद त्यांनी मांडला.

जेजुरी परिसरात अनेक लघु उद्योग असून शेकडो लोकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी जेजुरीकर ग्रामस्थ, मानकरी आणि खान्देकरी यांच्या वतीने डॉ. राजेंद्र खेडेकर यांनी केली आहे.

> “जेजुरी हे केवळ धार्मिक स्थळ नाही, तर देश-विदेशातून भाविकांना आकर्षित करणारे महत्त्वाचे पर्यटन केंद्र आहे. मेट्रोचा पल्ला जेजुरीपर्यंत वाढला तर तीर्थक्षेत्राच्या विकासाला मोठी चालना मिळेल आणि स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. सरकारने या मागणीचा गांभीर्याने विचार करावा.
> **–डॉ. राजेंद्र खेडेकर,** विश्वस्त, श्री मार्तंड देवस्थान.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046